क्रमांक : एमआयएस-०६१७/सीआर-५५/२०१७/तीन दिनांक :- १८ ऑक्टोबर, २०१७

**घोषणा**

**विषय :- काही स्पर्धा परीक्षा पध्दतीमधील बदलांबाबत -**

**(१) महाराष्ट्र दुय्यम सेवा संयुक्त पूर्व परीक्षा** - सहायक कक्ष अधिकारी, विक्रीकर निरीक्षक व पोलीस उपनिरीक्षक या अराजपत्रित गट-ब संवर्गातील भरतीकरीता.

**(२) महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा** - दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, कर सहायक व लिपिक-टंकलेखक या गट-क संवर्गातील भरतीकरीता.

महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील सहायक कक्ष अधिकारी, विक्रीकर निरीक्षक व पोलीस उपनिरीक्षक या संवर्गातील भरतीकरीता आयोगाकडून सन २०१६ पर्यंत स्वतंत्र जाहिरात प्रसिध्द करुन स्वतंत्र अर्ज मागविण्यात येवून प्रत्येक संवर्गाकरीता वेगवेगळया स्पर्धा परीक्षांचे आयोजन केले जात असे. या संबंधातील विविध पैलूचा विचार करुन सहायक कक्ष अधिकारी, विक्रीकर निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक या गट-ब अराजपत्रित संवर्गातील पदांवरील भरतीकरीता एकच संयुक्त पूर्व परीक्षा तसेच संबंधित संवर्गातील पदांची कर्तव्ये व जबाबदा-या लक्षात घेवून अभ्यासक्रमाच्या आधारे प्रत्येक पदासाठी स्वतंत्र मुख्य परीक्षा घेण्याचा निर्णय घेण्यात आला व त्याची अंमलबजावणी सन २०१७ पासून करण्यात आली. त्याच धर्तीवर दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, कर सहायक व बृहन्मुंबईतील विविध शासकीय कार्यालयातील लिपिक-टंकलेखक या गट-क संवर्गातील पदांवरील भरतीकरीता यापुढे संयुक्त पूर्व परीक्षा घेण्याचा आयोगाने निर्णय घेतला आहे. त्यानुसार गट-ब अराजपत्रित तसेच, गट-क मधील पदांसाठी आयोगामार्फत खालीलप्रमाणे दोन संयुक्त पूर्व परीक्षेचे आयोजन सन २०१८ पासून करण्यात येईल :-

**(१) महाराष्ट्र दुय्यम सेवा संयुक्त पूर्व परीक्षा** - सहायक कक्ष अधिकारी, विक्रीकर निरीक्षक व पोलीस उपनिरीक्षक या अराजपत्रित गट-ब संवर्गातील भरतीकरीता.

**(२) महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा** - दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, कर सहायक व लिपिक-टंकलेखक या गट-क संवर्गातील भरतीकरीता.

**२.** संयुक्त पूर्व परीक्षेच्या जाहिरातीस अनुसरुन, अर्ज करणा-या उमेदवारांकडून ते यापैकी एक, दोन किंवा तीनही पदांसाठी बसू इच्छितात काय, याबाबत विकल्प (Option) घेण्यात येईल. संबंधित संवर्गाकरीता उमेदवाराने दिलेला/ले विकल्प हा/हे संबंधित संवर्गातील पद भरतीकरीता अर्ज समजण्यात येईल/येतील व त्या आधारे तसेच, भरावयाच्या पदसंख्येच्या आधारे, संबंधित संवर्गाच्या मुख्य परीक्षेसाठी पात्र करावयाच्या उमेदवारांची संख्या निश्चित करुन प्रत्येक संवर्गाकरीता पूर्व परीक्षेचे स्वतंत्र निकाल जाहीर करण्यात येतील.

**३.** पूर्व परीक्षेच्या निकालाआधारे पात्र ठरलेल्या उमेदवारांकरीता प्रत्येक संवर्गासाठी स्वतंत्र मुख्य परीक्षा घेतल्या जातील. मात्र दुय्यम सेवेतील तीन संवर्गासाठी मुख्य परीक्षेचा पेपर क्रमांक १ हा सामाईक राहील व सदर पेपरची परीक्षा एकाच दिवशी एकत्र घेण्यात येईल. गट-क मधील तीन संवर्गासाठीही अशीच पध्दती लागू राहील. (पेपर क्रमांक १ सामाईक)

**४.** वरील दोन्ही गटातील संवर्गासाठी मुख्य परीक्षेचा पेपर क्रमांक २ मात्र संबंधित संवर्गाची/पदाची कर्तव्ये व जबाबदा-या लक्षात घेवून स्वतंत्रपणे घेण्यात येईल.

**५.** प्रस्तुत **महाराष्ट्र दुय्यम सेवा संयुक्त पूर्व परीक्षा** तसेच **महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षेसंदर्भात** अर्ज स्वीकारण्याची पध्दत, अर्हता, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम इत्यादीबाबतचा सविस्तर तपशील आयोगाच्या संकेतस्थळावर यथावकाश स्वतंत्रपणे प्रसिध्द करण्यात येईल.

**६.** वरील बदल **सन २०१८** मध्ये प्रसिध्द होणा-या जाहिरातीपासून लागू होतील.

ठिकाण: मुंबई

सुनिल अवताडे
उप सचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.